
पुण्यनगरी 07/01/2025

# ायफल, बंदुकी पाहून विद्यार्थी झाले दंग!

## पोलीस स्थापना दिनानिमित्त प्रदर्शन; पोलिस मुख्यालयात आयोजन





**नांदेड / प्रतिनिधी**

पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त पोलीस मुख्यालय येथे सोमवारी (दि. ६ जानेवारी) पोलीस दलाचे वतीने प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये जिल्हा पोलीस दलातील वेगवेगळया विभागाचे स्टॉल लावण्यात आले आहेत. सदरचे प्रदर्शन पाहाण्यासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दिवसभरात अनेक शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पोलीस मुख्यालय येथे प्रदर्शनाचा लाभ घेतला. या प्रदर्शनामुळे पोलीस दलाच्या कामकाजाची ओळख विद्यार्थ्यांना होत आहे.

या प्रदर्शनात पोलीस विभागाकडून सायबर सेल, भरोसा सेल, बॉम्बशोधक पथक, शस्त्र विभाग, श्वान पथक व श्वानाचे प्रदर्शन, वाहतुक विभाग, सुरक्षा हेल्पलाईन, वायरलेस यंत्रणा, अंगुलीमुद्रा आदी विभागातर्फे स्टॉल लावण्यात आले होते. सदर स्टॉलच्या ठिकाणी त्या त्या विभागाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्या विभागाचे कामकाज कसे चालते? या बाबत विद्यार्थी व नागरीकांना माहिती दिली. सदर पोलीस प्रदर्शन पाहण्यासाठी जवळपास दीड ते दोन हजार विद्यार्थी व नागरीकांनी सहभाग नोंदविला. तसेच सदर पोलीस स्थापना दिनानिमित्त पोलीस मुख्यालय येथे पोलीस परेडचे आयोजन करण्यात आले होते. सदर परेडमध्ये २५ पोलीस अधिकारी व १८० अंमलदार यांनी सहभाग घेतला आहे.

### एनसीसी, एनएसएस, माजी सैनिकांचा सत्कार

लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा निवडणूकीमध्ये पोलीसांना बंदोबस्तामध्ये सहकार्य करणारे एनसीसी कॅडेट, एनएसएस कॅडेट व माजी सैनिक असे एकुण २२८ जणांनी मदत केली. चांगला पद्धतीने बंदोबस्त केल्याने पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमानंतर पो अधीक्षक अबिनाश कुमार यांनी उपस् विद्यार्थी व नागरीक यांना पोलीस स्थ दिनानिमित्त मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाकरीता अबि कुमार, पोलीस अधिक्षक नांदेड, गुरव, अपर पोलीस अधिक्षक, नां मा. डॉ. अश्विनी जगताप, पोलीस अधीक्षक गृह नांदेड, उदय खंडेराय, स्थागुशा. विजय धोंडगे, राखीव पो निरीक्षक, पो. मु. नांदेड, तसेच वि पोस्टेचे, शाखेचे, पोलीस मुख्याल पोलीस अधीकारी व पोलीस अंम यांनी सहभाग नोंदवला आहे.